# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ६–२०१०/ दिनांक :

श्री. रत्नाकर रामचंद्र कुलकर्णी,
मु. पो. कंठी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महंकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**<u>कोरम</u> :–** १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रत्नाकर रामचंद्र कुलकर्णी मु.पो. कंठी, ता. जत, जि. सांगली यांनी गट क्र. ७५४ मध्ये ५ अश्वशक्ती इतक्या भारासाठी वीज जोडणी मिळावी म्हणून १८.९.२००८ रोजी चलन भरलेले आहे. तसेच २४.८.२००९ रोजी चाचणी अहवाल दिला आहे. असे असतांनासुध्दा विनियमातील तरतुदीनुसार वीज पुरवठा मिळाला नाही म्हणून दि. १४.१०.२००८ रोजी प्रथमत: अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष सांगली यांचेकड तक्रार दिली. मात्र त्यांनी दिलेला निर्णय मान्य न झालेने ८.१.२०१० रोजी प्रतिनिधी मार्फत मंचात तक्रार दाखल केली. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून वि.प. २८.१.२०१० मुद्देनिहाय अभिप्राय दाखल करण्याची मुदत दिली होती, त्या मुदतीत वि.प.ने मुद्देनिहाय अभिप्राय दाखल केला नसल्याने नाईलाजाने ३.३.२०१० रोजी सुनावणीची तारीख नक्की केली.

सुनावणीच्यावेळी कवठे महंकांळ विभाग कार्यकारी अभियंता श्री. भोसले व कनिष्ठ अभियंता कुलकर्णी उपस्थित होते. तसेच ग्राहकातर्फे प्रतिनिधी श्री. खापरे हेही उपस्थित होते. इतक्या विलंबाने सुनावणीची तारीख निश्चित करुनही वि.प.ने सदर प्रकरणात आवश्यक असलेले कागद दाखल करण्यासाठी मंचाकडे मुदत मागून घेतली. मंचाने ती दिली मात्र मुदत देवूनही वि.प.ने कागद हजर केलेले नाहीत. याचवेळी प्रतिनिधीनी निर्णयासाठी आग्रह धरला व विलंबासाठी भरपाईची मागणी लावून धरली.

श्री. रत्नाकर रामचंद्र कुलकर्णी मु.पो. कंठी यांनी गट क्र. ७५४ मध्ये ५ अश्वशक्तीसाठी वीज पुरवठा मिळावा म्हणून १८.९.२००८ रोजी चलन भरले व २४.९.२००८ रोजी चाचणी अहवाल दिल्याचे नमूद केले आहे. तथापि वि.प.ने आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात चाचणी अहवाल १६.१२.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तसेच पुढे जावून दि. १४.१२.२००८ रोजी जागेवर जावून संच मांडणी केली आहे काय ? याची तपासणी केली तेथे संच मांडणी नव्हती असे आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात नमूद केले आहे. वरील तारखांकडे बारकाईने लक्ष दिले असतां, १६.१२.२००८ च्या चाचणी अहवालाच्या आधी १४.१२.२००८ रोजी वि.प. जागेवर कसा गेला व कशाच्या आधारे त्याने पहाणी केली हे समजून येत नाही. मंचापुढे मुद्देनिहाय अभिप्राय दाखल करतांना संबंधित आवश्यक ते कागदपत्र दाखल करण्याची तसदीही वि.प. घेत नसल्याचे खेदाने नमूद करावे लागत आहे त्यामुळे ग्राहकाने दिलेल्या तारखांत व वि.प.ने दिलेल्या तारखां यामध्ये तफावत होत आहे.

सदर जोडणीसाठी ०.६ कि.मी. उच्चदाब व ०.६ लघुदाब वाहिनी व १०० केव्हीएचे एक रोहित्र असे एकूण काम करावयाचे आहे व सदर काम लवकरच करुन देण्यात येईल असे नमूद करुन शेजारच्या रोहित्रावरुन २१.१२.२००९ रोजी जोडणी दिल्याचे नमूद केले आहे. ग्राहकाने नेमके याच मुद्दयावर बोट ठेवून जर शेजारील रोहित्रावरुन वीज जोडणी शक्य होते तर नवीन रोहित्र उभारणी करुन लाईट देण्याचा प्रस्ताव मंजूर का केला ? जर तो प्रस्ताव योग्य असेल तर मग २४.१२.२००९ रोजी विद्युत पुरवठा कसा केला असा प्रश्न उपस्थित केला आहे. दि. १८.९.२००८ रोजी ग्राहकाने खर्च करावयाचे जे चलन ग्राहकाने भरले ते वि.प.कडून देत असतां त्यामध्ये लघु व उच्चदाब वाहिन्या व रोहित्र असे एस्टिमेट मंजूर झालेले आहे. ग्राहकाने दि. १८.९.२००८ रोजी चलन भरले असल्यामुळे व २४.९.२००८ रोजी चाचणी अहवाल दिला असल्यामुळे विनियमातील तरतुदीनुसार जास्तीतजास्त एक वर्षाच्या आंत असे रोहित्र व वाहिन्या उभ्या करुन जोडणी देणे योग्य होते. तथापि, वि.प.ने प्रत्यक्षात जोडणी २१.१२.२००९ रोजी दिलेली आहे. म्हणजे रोहित्र उभे करावयाचा कालावधी झाल्यावरसुध्दा तीन महिन्यापेक्षा जास्त काळ वि.प.कडून लागला आहे व त्यानंतर चालूच शेजारच्या रोहित्रावरुन वीज पुरवठा केला असल्याने ग्राहकाची केवळ दिशाभूल केलेली आहे असे मंचाचे मत आहे. दि. २४.९.२००८ चाचणी अहवाल दिल्यावर १४.१२.२००८ रोजी वि.प.कडून तपासणी झाली असे नमूद आहे मात्र तसा संयुक्त तपासणी अहवालाचा कागद मंचाने विचारणा करुनही तसेच वाहिनी व रोहित्र मंजुरीचा कागद वि.प.ने दाखल केलेला नाही. त्यासाठी मचाने प्रत्यक्षात कागद बघण्यासाठी वि.प.स मुदत देवूनही व सदरची बाब कार्यकारी अभियंता श्री. भोसले यांच्या नजरेस आणून देवूनही वि.प.ने कागद हजर केले नाहीत. त्यामुळे दाखल कागदपत्रांच्या आधारेच तक्रारीचा निर्णय घ्यावा लागत आहे ही बाब वि.प.स अशोभनीय आहे असे खेदाने नमूद करावेसे वाटते.

दि. १७.२.२०१० च्या पत्र क्र. १३९० या आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात कार्यकारी अभियंता यांनी जादा रोहित्राचे काम लवकरच करण्यात येत आहे असे मोघम उत्तर दिले आहे हीही बाब अत्यंत चुकीची आहे. दि. २४.९.२००८ रोजी चाचणी अहवाल ग्राहकाने दिला, त्यानंतरचा एक वर्षाचा कालावधी संच उभारणीसाठी दिला असतांनाही त्याहीपेक्षा विलंब होवून याहीवेळी संबंधित वि.प. नेमके निश्चित उत्तर देवू शकला नाही. तसेच २१.१२.२००९ दिलेली जोडणी कोणत्या चाचणी अहवालाच्या आधारे दिली, व तो ग्राहकाने केव्हा दाखल केला याही बाबीचा खुलासा वि.प.ने केलेला नाही. त्यामुळे २४.९.२००८ चा चाचणी अहवालाची तारीख गृहीत धरुन वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची आहे हे गृहीत धरुन तीन महिन्याच्या कालावधीत जोडणी देणे आवश्यक होते. त्या मुदतीत जोडणी न दिल्याने दि. २४.१२.२००८ ते २१.१२.२००९ या कालावधीसाठी प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– प्रमाणे भरपाई द्यावी असे मंचाचे मत आहे. त्याचप्रमाणे सुनावणीच्यावेळी म्हणजे दि. २०.४.२०१० रोजी तीन महिन्याच्या कालावधीत वाहिनी व रोहित्र उभे करुन देत असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी निश्चितपणे सांगितले आहे त्यामुळे दि. २०.४.२०१० नंतर १९.७.२०१० रोहित्र उभे करुन द्यावे असा मंच आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१) वर कारणमिमांसेत उल्लेख केल्याप्रमाणे २४.१२.२००८ ते २१.१२.२००९ या ५२ आठवड्यांचा विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु.५२००/–इतकी भरपाई विनियमातील तरतुदीप्रमाणे द्यावी.

२) त्याचप्रमाणे दि. २०.७.२०१० पर्यंत नवीन १०० केव्हीएचे रोहित्र व वाहिन्या उभ्या करुन देण्यात याव्यात व त्याप्रमाणे सदर रोहित्रावरुन ग्राहकास जोडणी देण्यात यावी.

३) मुद्दा क्र. १ मधील रकमेचे दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करुन उरलेली रक्कम चेकने अथवा रोखीने वि.प.ने ग्राहकास द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :